## अधिसूचना

क्रमांक गृह-१/कार्या-६/एमएजी-१/आरआर-२५५२/२०२३.— ज्याअर्थी, सहायक विभागीय अभियंता, मध्य रेल्वे, मिरज यांनी No. 19/LHS, दिनांक ७ डिसेंबर २०२३ अन्वये, पंचशीलनगर रेल्वे गेट क्रमांक १२९ दुरुस्तीचे कामकाजासाठी दिनांक १४ डिसेंबर २०२३ ते दिनांक २३ डिसेंबर २०२३ या कालावधीत बंद ठेवले जाणार असलेने पर्यायी मार्गाने वाहतूक वळविणेबाबत विनंती केली आहे ;

ज्याअर्थी, उपरोक्त नमूदप्रमाणे वाहतूक वळविणेसाठी वाहतूक नियंत्रण शाखा, सांगली यांनी अनुक्रमे वाचले क्रमांक ३ अन्वये पर्यायी वाहतूक मार्गांचा अहवाल सादर केला आहे.

त्याअर्थी, मी, डॉ. राजा दयानिधी, भा.प्र.से., जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सांगली, मला मोटर वाहन कायदा, १९८८, कलम ११५ व ११६ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पंचशीलनगर रेल्वे गेट क्रमांक १२९ दुरुस्तीचे कामकाजासाठी दिनांक १४ डिसेंबर २०२३ ते दिनांक २३ डिसेंबर २०२३ या कालावधीत बंद करून, सदर गेटवरून होणारी वाहतूक उपरोक्त कारणास्तव खालील मार्गांवरून वळविणेत येत आहे. वाहतूक सुरक्षा उपाययोजनेद्वारे वाहतूक नियंत्रित करण्याचे आदेश निर्गमित करीत आहे.

**तासगावकडून सांगली शहरात येणारे व जाणारे वाहनांसाठीचा मार्ग.--**

(१) माधवनगर रोड - साखर कारखाना चौक - संपत चौकामधून डावीकडे (पूर्वेकडे) वळण घेऊन औद्योगिक वसाहत मार्गे - संजयनगर १०० फुटी रोड - अहिल्यादेवी होळकर चौकातून उजवीकडे पश्चिमेकडे शिंदे मळा, रेल्वे ब्रिज खालून सांगली शहरात येता व जाता येईल.

(२) अहिल्यादेवी होळकर चौकातून डावीकडे पूर्वेस वळण घेऊन कुपवाड रोड - मंगळवार बाजार चौक - गांधी कॉलनी - सह्याद्रीनगर ओव्हर ब्रिज मार्गे शहरात जाता व येता येईल.

(३) शिवशंभो चौक - बायपास रोड - कर्नाळ रोड - भोरा म्हसोबा - रजपूत मंगल कार्यालयामार्गे - उजवीकडे वळण घेऊन रेल्वे गेट क्रमांक १२८ - माधवनगर जकात नाकामार्गे शहरात जाता व येता येईल.

जनतेच्या व वाहन चालकांच्या माहितीसाठी योग्य ठिकाणी दिशाचिन्हे व माहिती लावणेत यावी. या उपाययोजना कार्यकारी अभियंता, मध्य रेल्वे, मिरज, पोलीस अधीक्षक, सांगली, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सांगली व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज यांनी याबाबत एकत्रितपणे कराव्यात.

सहायक विभागीय अभियंता, मध्य रेल्वे, मिरज यांनी पंचशीलनगर रेल्वे गेट १२९ वरून होणारी वाहतूक प्रतिबंध करणेत आलेबाबतची माहिती जनतेला होणेसाठी ग्रामीण व शहरातील महत्त्वाच्या सार्वजनिक वाहतूक ठिकाणी ही अधिसूचना, तसेच वाहतुकीसाठी उपलब्ध पर्यायी मार्गांच्या माहितीस व्यापक प्रमाणात प्रसिद्धी देण्यात यावी. सदर निर्णयाची तात्काळ प्रभावी व संपूर्ण अंमलबजावणी करणेत यावी, तसेच सदर ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने RPF/Railway Police कडील अंमलदार यांची नियुक्ती तात्काळ करणेत यावी.

**डॉ. राजा दयानिधी,**

(भा.प्र.से.),

सांगली, १२ डिसेंबर २०२३. जिल्हादंडाधिकारी, सांगली.

---

## लवाद, नगर रचना यांजकडून

*नगर रचना परियोजना, म्हाळुंगे-माण क्रमांक १ (प्रथम फेरबदल) (प्राथमिक)*

## जाहीर प्रकटन

क्रमांक नरयो/म्हाळुंगे-माण क्र. १/जाहीर सूचना/१४३/२०२३.— महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम, १९७४ मधील नियम १३ *(९)* अनुसार याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील सही करणाऱ्यांनी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ७२ *(३), (४), (५), (७)* अन्वये मंजूर प्रारूप नगर रचना परियोजना, म्हाळुंगे-माण क्रमांक १ (प्रथम फेरबदल) च्या मसुद्यावर अनुसरून नगर रचना परियोजना, म्हाळुंगे-माण क्रमांक १ (प्रथम फेरबदल) (प्राथमिक) परियोजना तयार केलेली आहे. वरील प्राथमिक परियोजना आज गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर २०२३ रोजी या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर प्राथमिक नगर रचना परियोजना, लवाद, नगर रचना परियोजना, म्हाळुंगे-माण क्रमांक १, यांचे ५ वा मजला, पीएमआरडीए प्रशासकीय इमारत, आकुर्डी, पुणे-४११ ०४४ (ई-मेल पत्ता : arbitrator.pmr1@rediffmail.com) येथील कार्यालयात, तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे आकुर्डी, पुणे-४११ ०४४ येथील कार्यालयात कार्यालयीन वेळेत जनतेला अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सदर प्राथमिक नगर रचना परियोजना तयार करताना, कलम ७२ *(४)* प्रमाणे आवश्यक कार्यवाही करून, लवाद यांनी शासन मंजूर प्रारूप नगर रचना परियोजना, म्हाळुंगे-माण क्रमांक १ च्या मसुद्यामध्ये जमिनीच्या / मूळ भूखंडाच्या आणि त्यांच्या अंतिम भूखंडाच्या मालकी हक्कामध्ये / हितसंबंधामध्ये प्रस्तावित केलेले बदल जमीनधारकांच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे नगर रचना परियोजना, म्हाळुंगे-माण क्रमांक १ (प्रथम फेरबदल) (प्राथमिक) या योजनेतील सर्व भूखंडाबाबतचे लवादाचे निर्णय सर्व हितसंबंधित व्यक्तींना नमुना ४ *(अ)* मध्ये स्वतंत्रपणे कळविण्यात येत आहेत ;

आता, कलम ७२ *(५)* मधील तरतुदींप्रमाणे लवाद यांच्याकडून सदरहू प्राथमिक नगर रचना परियोजना, म्हाळुंगे-माण क्रमांक १ (प्रथम फेरबदल) (प्राथमिक) ही शासनाकडे, उक्त अधिनियमाच्या कलम ८६ अनुसार मंजुरीसाठी सादर करण्यात आलेली आहे.

**शिवराज जी. पाटील,**
लवाद,
नगर रचना परियोजना,
म्हाळुंगे-माण क्रमांक १, आकुर्डी, पुणे.

पुणे, २१ डिसेंबर २०२३.

---

## BY ARBITRATOR, TOWN PLANNING SCHEME

*Town Planning Scheme, Mhalunge-Maan No. 1 (First Variation) (Preliminary)*

## PUBLIC NOTICE

No. TPS/Mhalunge-Maan No. 1/Public Notice/143/2023.— It is hereby notified as required by rule 13 *(9)* of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974, that the undersigned has on this Thursday, the 21st December 2023, has published the Town Planning Scheme, Mhalunge-Maan No. 1 (First Variation) (Preliminary) in respect of the sanctioned draft Town Planning Scheme, Mhalunge-Maan No. 1 (First Variation), as drawn up under the provisions of Section 72 *(3) (4) (5) (7)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

The Preliminary Town Planning Scheme as drawn up by him, is kept open for inspection of the public during office hours on all working days in the office of the Arbitrator, Town Planning Scheme, Mhalunge-Maan No. 1, (address - 5th Floor, PMRDA Administrative Building, Akurdi, Pune-411 044) (e-mail address - arbitrator.pmr1@rediffmail.com) and also in the office of the Pune Metropolitan Region Development Authority, Akurdi, Pune-411 044.

The changes as proposed by the Arbitrator in the sanctioned draft Town Planning Scheme, Mhalunge-Maan No. 1, as provided in Section 72 *(4)* of the said Act, while framing Preliminary Town Planning Scheme, Mhalunge-Maan No. 1, in regard to the allotment of lands / original plots and / or ownership interest in the final plots are hereby published for information of the interested persons.

Relevant decisions of the Arbitrator in respect of the plots within the said Town Planning Scheme, Mhalunge-Maan No. 1 (First Variation) (Preliminary), are being communicated to all the concerned interested parties in Form 4A independently ;

Now, this Town Planning Scheme, Mhalunge-Maan No. 1, (First Variation) (Preliminary) has been submitted as per Section 72 *(5)* by the Arbitrator to the Government for sanction under Section 86 of the said Act.

**SHIVRAJ G. PATIL,**
Arbitrator,
Town Planning Scheme,
Mhalunge-Maan No. 1, Akurdi, Pune.

Pune, 21st December 2003.

---